(90)

आस्थापना - १

# मुंबई विद्यापीठ

क्र.इएसटी/आयसीडी/२०१५-१६/२९४३
मुंबई - ४०० ०३२
१२, फेब्रुवारी, २०१६.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमल बजावणीबाबत द्वितीय अपील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.सकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)सहा दि. ०१.१२.२०१५

**परिपत्रक :-**

विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी, सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय, प्रभारी परीक्षा नियंत्रक, प्रभारी प्राचार्य सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख, यांना विदित करण्यात येते की, माहिती अधिकारातील काही प्रकरणात माहिती अर्जास प्रतिसाद न दिल्याने प्रकरण प्रथम अपिलाकडे माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी करण्यानुषंगाने वर्ग केले जाते. अशा प्रकरणी सकारात्मक कार्यवाही न करता हेतू पुरस्सर टाळाटाळ केली जाते. प्रथम अपिलीय अधिकारी, तात्कालीन जन माहिती अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्व परवानगी शिवाय किंवा कोणतीही लेखी सुचना न देता अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहतात असे शेरे श्रीमती दुर्गा जोहरी यांनी केलेल्या द्वितीय अपील क्र.२९४२/२०१४ रोजी निर्णय देताना मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी निर्णयामध्ये नमूद केले असून त्याकडे मा. मुख्य सचिव महोदयांचे लक्ष वेधले असता मा. मुख्य सचिव महोदयांनी आदेशित केल्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे आदेश दिला आहे :-

" माहिती अधिकार प्रकरणात अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी. माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिका-याने तसेच प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती उपलब्ध करून देण्यास हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

सन्माननिय मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

(स्वाक्षरी) १५/२/१६
कुलसचिव